दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१५ जुलै २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ३०८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wesdnesday 15 July 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 308 | Pages 4 | Rate 4 Rs


### ३५० कोटींच्या पीकविम्याचा मार्ग मोकळा

**मुंबई**–गेल्या वर्षभरापासून आपल्या हक्काच्या पीकविम्यासाठी संघर्ष करणाऱ्या धाराशिव जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. खरीप २०२५च्या सोयाबीन पीकविमाप्रकरणी शेतकऱ्यांनी मोठी कायदेशीर लढाई जिंकली असून, केंद्र सरकारच्या 'सेंट्रल टेक्निकल व्हायझरी कमिटी'ने (TAC) विमा कंपनीचे अपील फेटाळून लावले आहे. यामुळे जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना सुमारे ३५० कोटी रुपयांची नुकसानभरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी यासंदर्भात माहिती देत आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी 'एक्स'वरून माहिती दिली की, केंद्र सरकारच्या तांत्रिक सल्लागार समितीने (TAC) राज्य तांत्रिक सल्लागार समितीचा (STAC) निर्णय कायम ठेवत विमा कंपनीचे सर्व आक्षेप फेटाळले आहेत. तसेच, पुढील ७ दिवसांत पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पीकविमा भरपाई जमा करण्याचे स्पष्ट आदेश विमा कंपनीला देण्यात आले आहेत.

# शेतकऱ्यांना मोठा दिलासा ते एसटी बसस्थानकांचा कायापालट

## फडणवीस सरकारचे मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय

**राज्यातील शेतकरी, पायाभूत सुविधा आणि शहरी विकासाला मोठी गती देण्यासाठी राज्य सरकारने आज महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १४ जुलै रोजी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८ अत्यंत महत्त्वाचे आणि राज्याचा चेहरामोहरा बदलणारे निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना थेट फायदा होणार आहे. राज्यातील कृषी क्षेत्राला बळकटी देणे, शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणातून बाहेर काढणे आणि राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास करणे हे राज्य सरकारचे प्रमुख उद्दिष्ट आहे, महायुती सरकारने याच धोरणावर भर दिला आहे. विशेषतः शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून कर्जमाफीच्या निकषांमध्ये केलेले बदल आणि एसटी महामंडळाच्या जागांचा विकास करण्याचे निर्णय राज्याच्या अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे ठरणार आहेत.**

### आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी बाजारपेठ

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील मौजे दापचरी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारला जाणार आहे. यासाठी दुग्ध प्रकल्पाची ५५८.४३ हेक्टर जमीन महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाला देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे पालघर आणि ठाणे परिसरातील शेतकऱ्यांना जागतिक दर्जाच्या पणन सुविधा उपलब्ध होतील.

### शेतकऱ्यांना पीक कर्जात मोठा दिलासा

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना– २०२६' च्या निकषांमध्ये मोठी सुधारणा करण्यात आली आहे. २०२९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करून त्यांना नियमित कर्जमाफी दिली जाईल. तसेच, २०२६–२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्यामुळे राज्यातील तब्बल २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.

### एसटी बसस्थानकांचा पीपीपी तत्त्वावर विकास

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (डढ) राज्यभरातील जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील अतिरिक्त जागांचा आणि बसस्थानकांचा पीपीपी (झझझ) तत्त्वावर विकास करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### गौण खनिज उत्खनन नियमात बदल

महसूल व वन विभागाच्या अखत्यारीतील 'महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३' मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

मंत्रिमंडळाच्या या निर्णयांनंतर आता संबंधित विभागांकडून तातडीने शासन निर्णय (GR) जारी केले जातील. दापचरी येथील कृषी बाजारपेठेचा आराखडा तयार करून निविदा प्रक्रिया राबवली जाईल. तसेच, राज्यातील एसटी बसस्थानकांचा व्यावसायिक आणि प्रवासी सुविधांच्या दृष्टीने विकास करण्यासाठी खासगी कंपन्यांसोबत भागीदारी (PPP) करण्याच्या प्रक्रियेला गती दिली जाईल. कर्जमाफीच्या निकष बदलामुळे पात्र शेतकऱ्यांच्या याद्या अद्ययावत करून त्यांच्या खात्यात थेट लाभ जमा करण्याची प्रक्रिया सुरू होईल.या ८ धडाकेबाज निर्णयांमुळे राज्याच्या ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही अर्थव्यवस्थांना मोठी चालना मिळणार आहे. ५० हजार रुपयांची मर्यादा आणि नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने राज्यातील एकूण ३६ लाख (१३ लाख+२३ लाख) शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी फुटणार आहे. एसटीच्या जागांच्या विकासामुळे प्रवाशांना आधुनिक सुविधा मिळतील आणि एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढेल. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःच्या मालमत्तांतून उत्पन्न मिळवण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शहरांचा विकास वेगाने होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मुद्रीकरण धोरण

राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना उत्पन्नाचे नवे मार्ग शोधता यावेत, यासाठी मालमत्तांसाठी 'मुद्रीकरण (Monetization) धोरण' मंजूर करण्यात आले आहे.

### अर्बन चॅलेंज फंड

'शहरांमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यात केंद्र शासन पुरस्कृत 'अर्बन चॅलेंज फंड अभियान' राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### बीड क्रीडा संकुलाला निधी

बीड जिल्हा क्रीडा संकुलाच्या आधुनिकीकरणासाठी २४.९५ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. यात सिंथेटिक थलेटिक ट्रॅक, विविध खेळांची मैदाने आणि वसतिगृहाचा समावेश आहे.

### निर्दोष बंद्यांसाठीच्या अनुदानात दुप्पट वाढ

अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ अंतर्गत, निर्दोष सुटलेल्या आणि परिविक्षाधीन कैद्यांना देण्यात येणारे सहायक अनुदान २५ हजार रुपयांवरून थेट ५० हजार रुपये इतके करण्यात आले आहे.

# सौरऊर्जा प्रकल्पाविरोधात आवाज उठवणाऱ्या ११ शेतकऱ्यांना नोटिसा; भोकर तालुक्यात संतापाची लाट

## उच्चदाब वीजवाहिन्यांच्या कामात अडथळा होऊ नये म्हणून प्रशासनाची कारवाई; सुपीक जमिनी वाचविण्यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष तीव्र

दैनिक वादळ वार्ता
**भोकर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील चिंचाळा, नागापूर व परिसरात उभारण्यात येत असलेल्या सौरऊर्जा प्रकल्पाला विरोध करणाऱ्या ११ शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नोटिसा बजावण्यात आल्याने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. वीज वहन टॉवर उभारणी तसेच उच्चदाब वीजवाहिन्यांच्या कामात अडथळा निर्माण होऊ नये, या कारणास्तव संबंधित शेतकऱ्यांना पाबंद करण्याच्या आशयाच्या नोटिसा देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

भोकर तालुक्यात हजारो एकर क्षेत्रावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. या प्रकल्पासाठी काही शेतजमिनी थेट खरेदी करण्यात आल्या असून, तर अनेक जमिनी २९ वर्षांच्या लीज कराराद्वारे ताब्यात घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या प्रकल्पासाठी सुपीक शेतीजमिनींचा वापर होत असल्याने भविष्यात शेती उत्पादन घटण्याची तसेच अन्नसुरक्षेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत अनेक शेतकरी प्रकल्पाविरोधात उभे ठाकले आहेत.

याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने आंदोलन करणाऱ्या व विरोध दर्शविणाऱ्या ११ शेतकऱ्यांना नोटिसा बजावल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे. नोटिसा मिळालेल्या शेतकऱ्यांमध्ये भोकर येथील मंगला संजय देशमुख, गोविंदबाबा गौड पाटील, दिलीप देविदास देशपांडे, व्यंकट शंकरराव माने, चिंचाळा येथील ज्योती जनार्धन ढवळे, आनंद सूर्यवंशी, आनंद डुबुसवाड तसेच नागापूर येथील मारोती बेरडेवाड, नागोराव पांचाळ, माधवराव हेमे आणि रुकमाजी बेरडेवाड यांचा समावेश आहे.

दरम्यान, संबंधित यंत्रणांकडून प्रकल्पासाठी आवश्यक जमिनी स्वेच्छेने व्यवहारातून मिळाल्याचा दावा केला जात असला, तरी विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांवर नोटिसांची कारवाई करण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून संवादाच्या माध्यमातून मार्ग काढण्याऐवजी कारवाईचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचा आरोपही स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

प्रशासनाने दडपशाहीचे धोरण अवलंबण्याऐवजी शेतकऱ्यांशी सकारात्मक चर्चा करून सर्वमान्य तोडगा काढावा, अशी जोरदार मागणी आता परिसरातून पुढे येत असून, या प्रकरणाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला शासकीय कामात अडथळा, चौघांविरुद्ध गुन्हा

## दोघे आरोपी ताब्यात; उर्वरितांचा शोध सुरू

दैनिक वादळ वार्ता
**हिंगोली । प्रतिनिधी**

शासकीय कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सेनगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोघा आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. १२ जुलै) सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास गणेशपूर–हत्ता मार्गावर पोलीस पथक एमएच–२२ एएन–२२९१ क्रमांकाच्या पिकअप वाहनावर




कारवाई करत होते. त्यावेळी गजानन वामन चव्हाण, सुदाम वसाराम चव्हाण, राजेश सुभाष चव्हाण आणि वामन भुरा चव्हाण (रा. गणेशनगर तांडा, ता. जिंतूर, जि. परभणी) यांनी संगनमताने शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे.

यावेळी आरोपींनी कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करत मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेप्रकरणी पोलीस हवालदार जिवत आनंदराव मस्के (वय ४२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सेनगाव पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १३२, १२१(१), २२१, ११५(२), ३५२, ३५१(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार आर. एन. खंदारे व पोलीस उपनिरीक्षक आर. टी. खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, आरोपी क्रमांक २ व ३ यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास सेनगाव पोलीस करीत आहेत.

# राज्यमार्ग २५१ ठरतोय अपघातांचा हॉटस्पॉट; तिसऱ्याच दिवशी पुन्हा भीषण धडक

## तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन दुचाकींची समोरासमोर धडक; तिघे जखमी, सुरक्षाव्यवस्थेवर नागरिकांनी उपस्थित केले प्रश्नचिन्ह

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव । प्रतिनिधी**

नांदेड–हदगाव राज्यमार्ग क्रमांक २५१ वरील अपघातांची मालिका सुरूच असून, दोन दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर सोमवारी तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन तिघेजण जखमी झाले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली असली, तरी सलग घडणाऱ्या दुर्घटनांमुळे या मार्गाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

सोमवारी दुपारच्या सुमारास झालेल्या या अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली आणि उपचारासाठी तामसा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर पिंगळी येथील स्वाती मारुती गव्हाणे व मारुती भीमराव गव्हाणे यांना पुढील उपचारासाठी नांदेडच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. तर रुई (ता. हदगाव) येथील एक जखमी खासगी रुग्णालयात उपचार घेत असून तिन्ही जखमींची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे समजते.

तामसा शहरातून जाणारा राज्यमार्ग २५१ हा नेहमीच वर्दळीचा मार्ग आहे. भरधाव वेगाने धावणारी वाहने, वाहतूक नियमांचे उल्लंघन, चौकांमध्ये अपुऱ्या सुरक्षाव्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणाचा अभाव यामुळे या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, याच मार्गावर अवघ्या दोन दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतरही संबंधित विभागांकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

राज्यमार्गावरील अपघातांची वाढती संख्या लक्षात घेता सार्वजनिक बांधकाम विभाग, वाहतूक शाखा आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने वेगमर्यादा फलक, स्पीड ब्रेकर, रिफ्लेक्टर, इशारा फलक आणि वाहतूक नियंत्रणाच्या प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा राज्यमार्ग २५१ हा सुरक्षित प्रवासाचा मार्ग न राहता 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.



# संपादकीय

## शहर आपले जबाबदारीही आपलीच

शहराचा विकास हा एकतर्फी प्रयत्नांनी होत नाही. प्रशासनाची कार्यक्षमता, लोकप्रतिनिधींची बांधिलकी आणि नागरिकांची जबाबदारी या तीनही घटकांचा समन्वय असेल, तरच स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि सक्षम शहराची निर्मिती होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक समस्येसाठी दोषारोप करण्यापेक्षा 'माझे शहर, माझी जबाबदारी' ही भावना प्रत्येक नागरिकाने स्वीकारणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.पावसाळा सुरू झाला की शहरांतील अनेक समस्या पुन्हा एकदा समोर येतात. मुसळधार पाऊस, तुंबलेले रस्ते, चोकअप झालेली गटारे आणि नाले, वाहतुकीचा खोळंबा, कचऱ्याचे ढीग, दूषित पाणी आणि विस्कळीत नागरी सुविधा अशा अनेक अडचणी नागरिकांना दरवर्षी भेडसावतात. अशा वेळी प्रशासन, महानगरपालिका किंवा लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उठते. ही टीका काही अंशी योग्यही असते, कारण नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची आहे. मात्र प्रत्येक समस्येचे संपूर्ण खापर केवळ प्रशासनावर फोडून चालणार नाही. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही तितकीच आहे. शहराच्या विकासाचा विचार केला, तर प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक हे एका त्रिकोणाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. यापैकी एक घटक निष्क्रिय राहिला, तर विकासाचा समतोल बिघडतो. प्रशासन नियोजन करते, निधी उपलब्ध करून देते, रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधा पुरवते. लोकप्रतिनिधी नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवतात, विकासकामांवर पाठपुरावा करतात आणि लोकांच्या अपेक्षा शासनापुढे मांडतात. पण या दोघांच्या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो.पावसाळ्यात पाणी तुंबण्याची, गटारे-नाले चोकअप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे गटारामध्ये अडकलेला कचरा. मुळातच गटारे ही घरातील पाणी, सांडपाणी वाहून जाण्याचे कार्य करत असतात. पण नागरिक याचे भान न ठेवता गटारांमध्ये, नाल्यांमध्ये घरातील लहान-मोठे अडगळीचे साहित्यही फेकून देत असतात. त्यावेळी हे सामन गटारातून वाहून जाणे शक्य नसल्याचे भानही त्यांना राहत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. काही अंतरावर हे साहित्य वाहून गेल्यावर पुढे अडकते व पाणी तुंबण्याची प्रक्रिया सुरू होते आणि खापर मात्र त्या त्या महापालिका प्रशासनावर व स्थानिक लोकप्रतिनिधींवर फोडले जाते.आज अनेक ठिकाणी गटारे आणि नाले चोकअप होण्यामागे केवळ अपुरी यंत्रणा कारणीभूत नसते. प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल, घरगुती कचरा, बांधकामातील मलबा आणि इतर घनकचरा नाल्यांमध्ये टाकण्याची प्रवृत्ती ही मोठी समस्या आहे. पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या मार्गात कचरा अडकल्याने पाणी रस्त्यावर साचते आणि पूरस्थिती निर्माण होते. त्यानंतर प्रशासनावर टीका केली जाते. पण जर नागरिकांनी कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाटीस लावला, तर अशा अनेक समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात. स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सवय असली पाहिजे. घरासमोर, रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, प्लास्टिकचा बेजबाबदार वापर करणे, नाल्यांमध्ये घाण सोडणे किंवा सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणे या सवयी शहराला बकाल बनवतात. याउलट नागरिकांनी स्वच्छतेबाबत जागरूक राहून नियमांचे पालन केले, तर शहराचे रूप बदलू शकते. दुसरीकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारीही तेवढीच महत्त्वाची आहे.गटारांची वेळेत साफसफाई, नाल्यांतील गाळ काढणे, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुरुस्ती, पावसाळ्यापूर्वी आवश्यक उपाययोजना आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे ही त्यांची कर्तव्ये आहेत. विकासकामांमध्ये पारदर्शकता, गुणवत्तापूर्ण कामे आणि नियमित देखभाल असेल, तर नागरिकांचा विश्वास वाढतो. कार्यक्षम प्रशासन आणि संवेदनशील लोकप्रतिनिधी हे कोणत्याही शहराच्या प्रगतीचे आधारस्तंभ असतात. मात्र नागरिकांनीही केवळ टीकाकाराची भूमिका न घेता भागीदाराची भूमिका स्वीकारली पाहिजे. परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा वर्गीकरण करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, स्थानिक स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी होणे, चुकीच्या प्रकारांना विरोध करणे आणि नागरी नियमांचे पालन करणे या छोट्या वाटणाऱ्या गोष्टी शहराच्या विकासात मोठे योगदान देतात.विकसित देशांमध्ये प्रशासनाबरोबर नागरिकही तितक्याच जबाबदारीने वागतात. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, वाहतुकीचे नियम पाळणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि नागरी शिस्त पाळणे ही त्यांची संस्कृती बनलेली आहे. भारतातील शहरांनाही अशाच लोकसहभागाची गरज आहे. केवळ शासन बदलून किंवा अधिकारी बदलून शहरांचे चित्र बदलत नाही; त्यासाठी नागरिकांची मानसिकता बदलणे अधिक आवश्यक असते. खरे तर शहर ही केवळ शासनाची मालमत्ता नसून प्रत्येक नागरिकाचे सामूहिक घर असते. घर जसे स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो, तसेच सार्वजनिक ठिकाणांबाबतही आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे. नागरिक आणि प्रशासन यांनी एकमेकांचे विरोधक नव्हे, तर विकासाचे सहकारी म्हणून काम केले, तर अनेक नागरी समस्या सहज सोडवता येतील. पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या नागरी समस्यांचा उद्रेक हा राजकारणाचा अथवा चिखलफेकचा विषय असूच शकत नाही. पावसामुळे निर्माण झालेल्या दुर्घटनांनी रहिवासी आधीच त्रस्त झालेले असतात. त्यांना समस्येवर तोडगा हवा असतो, अडचणीतून निघण्यासाठी मदत हवी असते. या काळात जो मदत करेल, तोच त्यांचा खरा तारणहार असतो.

# बोरद आरोग्यवर्धिनी केंद्राचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर साध्या कागदावर 'केस पेपर' देण्याची नामुष्की,रुग्ण हवालदिल!

## कर्मचाऱ्यांच्या दांड्या आणि 'केस पेपर' गायब; माजी जि.प.सदस्यांच्या नातेवाईकालाही बसला फटका; वरिष्ठ अधिकारी कारवाई करणार का?

दैनिक वादळ वार्ता
**दिपक गोसावी । नंदुरबार**

ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना त्यांच्या हक्काच्या गावातच दर्जेदार आणि मोफत वैद्यकीय उपचार मिळावेत, या उदात्त हेतूने शासनाने लाखो रुपये खर्च करून ठिकठिकाणी 'आरोग्यवर्धिनी केंद्र' उभारली. या केंद्रातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांना शासकीय तिजोरीतून दरमहा लाखो रुपयांचे वेतन दिले जाते. मात्र, बोरद येथील आरोग्यवर्धिनी केंद्रात सध्या या संकल्पनेलाच हरताळ फासला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या केंद्रात प्राथमिक उपचाराचा मुख्य दस्तऐवज असलेला 'केस पेपर'च उपलब्ध नसल्याने, रुग्णांना चक्क साध्या कोऱ्या कागदावर औषधे लिहून देण्याची नामुष्की येथील प्रशासनावर ओढवली आहे. येथील स्थानिक वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कमालीच्या उदासीनतेमुळे सामान्य रुग्णांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची संतप्त भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.




बोरद हे परिसरातील असंख्य लहान-मोठ्या खेड्यांचे मुख्य केंद्रस्थान आहे. दररोज परिसरातील दुर्गम भागातून शेकडो मजूर, शेतकरी, लहान मुले आणि विशेषतः गरोदर माता मोठ्या आशेने या ठिकाणी उपचारासाठी येत असतात. वैद्यकीय नियमांनुसार, कोणत्याही रुग्णाची तपासणी करताना 'केस पेपर' हा सर्वात महत्त्वाचा कायदेशीर आणि वैद्यकीय दस्तऐवज असतो. या पेपरवर रुग्णाची जुनी आजारपणं, त्याला दिलेली ट्रीटमेंट, औषधांचा डोस आणि उपचार करणाऱ्या डॉक्टर किंवा कर्मचाऱ्याचा नोंदणी क्रमांक नमूद असतो. भविष्यात रुग्णाला पुढील उपचारासाठी मोठ्या रुग्णालयात जावे लागल्यास हाच 'केस पेपर' त्याचा वैद्यकीय इतिहास म्हणून काम करतो.

मात्र, बोरद केंद्रात गेल्या अनेक दिवसांपासून केस पेपर संपलेले असतानाही, येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वरिष्ठ पातळीवरून ते मागवण्याची साधी तसदी देखील घेतलेली नाही. साध्या कोऱ्या कागदावर दिली जाणारी औषधोपचाराची चिठ्ठी हरवल्यास किंवा काही वैद्यकीय गुंतागुंत निर्माण झाल्यास याला जबाबदार कोण? असा गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहे.

या आरोग्य केंद्राच्या ढिसाळ कारभाराचा फटका केवळ सामान्य जनतेलाच नाही, तर लोकप्रतिनिधींनाही बसू लागला आहे. नुकतेच जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा पंचायत समितीचे माजी सदस्य दिवाकर पवार यांच्या एका नातेवाईकाला वैद्यकीय तपासणीसाठी या केंद्रात आणण्यात आले होते. मात्र, एका माजी लोकप्रतिनिधीच्या नातेवाईकाला देखील साधा केस पेपर उपलब्ध करून देता आला नाही. स्वतः दिवाकर पवार यांनी या परिस्थितीबाबत अत्यंत तीव्र शब्दांत खंत व्यक्त केली असून, येथील कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारावर बोट ठेवले आहे. जर लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांची ही परवड होत असेल, तर खेड्यापाड्यातून येणाऱ्या निरक्षर व गरीब रुग्णांचे हाल काय होत असतील, याची कल्पनाच न केलेली बरी.

नागरिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, येथील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर सेवेत हजर राहत नाहीत. हक्काचे शासकीय वेतन पदरात पाडून घेणारे हे पांढरपेशी कर्मचारी ड्युटीच्या वेळेत नेमके कुठे असतात? असा रोखठोक सवाल जनता विचारत आहे. रुग्णालयात वेळेवर डॉक्टर न मिळणे आणि साध्या प्राथमिक सुविधाही उपलब्ध नसणे यामुळे गरीब रुग्णांना नाइलाजास्तव खाजगी डॉक्टरांकडे धाव घ्यावी लागत आहे. आधीच आर्थिक संकटात असलेल्या ग्रामीण भागातील जनतेला खाजगी उपचारांमुळे हजारो रुपयांचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे. मग शासनाच्या या कोट्यवधींच्या योजना काय केवळ कागदावर मिरवण्यासाठी आहेत का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. आरोग्य केंद्रात तात्काळ अधिकृत केस पेपर उपलब्ध करून देण्यात यावेत, कोऱ्या कागदाचा खेळ थांबवावा. सर्व डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची हजेरी बायोमेट्रिक पद्धतीने तपासली जावी आणि ते वेळेवर उपलब्ध राहतील याची खात्री करावी. कर्तव्यात कसूर करणाऱ्या आणि केस पेपर सारख्या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करणाऱ्या स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.या सर्व गंभीर प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः बोरद आरोग्यवर्धिनी केंद्राला अचानक भेट देऊन येथील कारभार सुधारावा आणि रुग्णांची होणारी ससेहोलपट थांबवावी, अन्यथा परिसरातील जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# राजकीय हित साध्य झाले आता लाडक्या बहिणींना विसरले!

## विजय वडेट्टीवार यांचा महायुती सरकारला टोला

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

निवडणुकीपूर्वी लाडक्या बहिणी म्हणून ज्या महिलांना डोक्यावर घेतले, त्याच महिलांना सत्ता मिळताच योजनेतून (लाभातून) बाहेरचा रस्ता दाखवला जात आहे. तब्बल ९२ लाख महिलांना योजनेतूनळ वगळण्याचा निर्णय हा महिलांच्या विश्वासघाताचा आणि राजकीय स्वार्थाचा कळस आहे.असा जबरजस्त टोला कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारला लगावलासत्ता मिळवण्यासाठी कोणतीही शहानिशा न करता सरसकट लाभ वाटण्यात आला, पण आता वेगवेगळे निकष लावून महिलांना अपात्र ठरवले जात आहे. जर त्या महिला अपात्र होत्या, तर त्यांना आधी लाभ का देण्यात आला? आणि जर त्या पात्र होत्या, तर आता त्यांना वगळण्याचे कारण काय? या योजनेवर १४ हजार कोटी रुपयांचा खर्च झाला. या पैशांच्या नियोजनातील गोंधळ, चुकीचे निकष






आणि राजकीय फायद्यासाठी केलेल्या निर्णयांचा हिशोब कोण देणार?महिलांच्या भावनांशी खेळ करून, त्यांच्या नावावर राजकारण करून आणि सत्ता मिळताच त्यांना वाऱ्यावर सोडण्याचे काम महायुती सरकारने केले आहे. लाडक्या बहिणींसाठी नव्हे, तर मतांसाठी योजना होती का? हा प्रश्न आज प्रत्येकाच्या मनात आहे ! असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. महायुती सरकारने निवडणूकीपुर्वी सत्ता काबिज करण्यासाठी १८ ते ६५ वयातील महिलांना सरसकट १५०० रूपये दरमहा देण्याचे आश्वासन दिले होते. सत्ता आल्यावर महायुती सरकारने सरकट लाडक्या बहिणांना १५०० दरमहा देण्याचे आश्वासन काही महिने पाळले. यामध्ये काही पुरूषांनीही लाभ घेतल्याचे उघड झाले. अशा बोगस लाभार्थ्यांवर सरकारने दंडीत कारवाई केला नाही. मात्र ९२ लाख लाडक्या बहिणींना महायुती सरकारने या योजनेतून वगळल्याने विरोधकांनी टिकेची झोड उठवली आहे.

# संधीचे सोनं तेव्हाच होईल जेव्हा हे जीवन जनसामान्यांसाठी समर्पित असेल-आ.विक्रांत पाटील






दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

माझ्या वरिष्ठांनी मला मोठी संधी दिली आहे. त्या संधीचे सोनं तेव्हाच होईल जेव्हा हे जीवन जनसामान्यांसाठी समर्पित असेल. नागरिकांचे प्रेम, मायमाउलींचे आशीर्वाद, मोठ्या प्रमाणात युवा शक्तीचे ताकद, जनतेतून मिळत असलेले उदंड प्रेम या ताकदीपुढे धनाची ताकद नगण्य आहे. जनतेचे माझ्या प्रति असलेले प्रेम पाहून मी अक्षरशः भरावून गेलो. मला अशीच तुमची सेवा करण्याची संधी द्या अशी भावना आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केली.

१२ जुलै या त्यांच्या वाढदिवसानिमित्त ते नवीन सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात बोलत होते. यावेळी मोठ्या प्रमाणात महिला भगिनी आमदार विक्रांत पाटील यांना आशिर्वाद देण्यासाठी जमल्या होत्या. त्यांनी पुढे सांगितले की मी तुमच्या कुटुंबातील सदस्य आहे. त्यामुळे कोणतेही काम घेऊन येताना कोणताही संकोच करू नका. पक्षांनी तुमची सेवा करण्याची संधी दिली आहे. त्यात कधीही कमी पडणार नाही. आज मला तुमचे मिळत असलेले प्रेम पाहून मी एवढा भारावून गेलो की आता माझ्या हातून कुठेतरी तुमची सेवा होत आहे. तुम्ही एवढी लाख मोलाची माणसे हेच माझे धन आहे. यापेक्षा कोणतेही धन मोठे असू शकत नाही. काहींनी चार चार वेळा आमदारकी, खासदारकी चार वेळा मंत्रिपद भोगले तसे माझे काहीच नाही. मी एक सामान्य परिवारातून आलेला कार्यकर्ता आहे. त्यामुळे मला काही धन पाहिजे ना माझ्या वडीलांना धनाची अपेक्षा केली त्यांनी भाजपमध्ये आपले आयुष्य घालविले. त्यांनी फक्त माणसे कमाविले आणि तेच काम मी करत आहे.आणि हे तुम्ही देत असलेल्या प्रेमातून दिसून येत आहे. मला तुम्ही पाहिजे. तुम्ही म्हणजेच माझे सर्वात मोठे धन आहे. तुमच्या प्रेमातून आशिर्वादातून मी घडत आहे. आणि माझ्या वडिलांनी कधीच धनाचा विचार केला नाही आणि माझ्यासाठी ते गौण आहे. आमदार विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कळंबोली येथील नवीन सुधागड शाळेच्या सभागृहात विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे भव्य आयोजन युवा नेते संदीप आल्या म्हात्रे आणि देविदास खेडकर यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या वेळी गरजू नागरिकांसाठी मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप, रक्तदान शिबीर, महिलांना साडी वाटप, गरजू महिलांना आर्थिक मदत, अन्न धान्याचे किट, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, पुस्तके वाटप, तसेच विद्यार्थ्यांसाठी छत्री वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या माध्यमातून समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देत आ. विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य समाजोपयोगी कार्यातून साजरे करण्यात आले.या वेळी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, नगरसेवक राजेंद्र शर्मा, विशाल बोबडे, डी. एन मिश्रा, आबा घुटुकडे, संदीप जाधव, सुनील जाधव यांच्यासह विक्रांत पाटील युवाशक्ती मंचाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच कळंबोली भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रसिद्धी पत्रक**

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :-बालाजी विष्णू गायकवाड रा. धारूर
यांना श्री. शेख मुखीद शे. खाजामियाँ रा. परभणी
यांचे कडून खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.४८८ खुला प्लॉट नं.४० व ४१
वार्ड क्रं.१३ विभाग. कळंबरोड
भाग नं. १ प्लॉट न. ४०
पू.प.३३ द.उ.१६ फूट
पुर्व : प्लॉट नं.३२
पश्चिम : रोड
दक्षिण : प्लॉट नं.४१
उत्तर : प्लॉट नं.३९
भाग नं. २ प्लॉट न. ४१
पू.प.३३ द.उ.१६ फूट
पुर्व : प्लॉट नं.२२
पश्चिम : रोड
दक्षिण : प्लॉट नं.४२
उत्तर : प्लॉट नं.४०
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं .९८ दि.११ /१ /२००२ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

# तळोदा तालुक्यात ठिबक व तुषार सिंचन योजनेला गती; अनुसूचित जाती-जमातींसाठी तब्बल ९०% तर सामान्य शेतकऱ्यांसाठी ७५% अनुदान!

## पाण्याची ४० ते ७० टक्के तर उत्पादनात २० ते ५० टक्के होणार वाढ; तालुका कृषी अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**

**दिपक गोसावी । नंदुरबार**

सध्याच्या बदलत्या हवामानात शेती अधिक शाश्वत, आधुनिक आणि फायदेशीर करण्यासाठी पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. हेच लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी 'प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत' ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा, असे कळकळीचे आवाहन तळोदा तालुका कृषी अधिकारी मिनाक्षी वळवी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विविध योजनांच्या समन्वयातून तब्बल ७५% ते ९०% पर्यंत भरीव अनुदान उपलब्ध करून दिले जात आहे.

पारंपरिक पद्धतीने मोकळे पाणी देण्याऐवजी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर केल्यास शेतीमध्ये आमूलाग्र बदल होतो. कृषी विभागाने याचे पुढील प्रमाणे सविस्तर फायदे स्पष्ट केले आहेत:या तंत्रज्ञानामुळे पाण्याचा अपव्यय पूर्णपणे थांबतो. कमीत कमी पाण्यात जास्तीत जास्त क्षेत्रावर सिंचन करणे शक्य होते. पिकांना आवश्यकतेनुसार योग्य प्रमाणात आणि थेट मुळापाशी पाणी मिळत असल्याने पिकांची वाढ जोमदार होते आणि उत्पादनात मोठी वाढ होते. पाणी संपूर्ण शेतात न पसरता केवळ मुख्य झाडालाच दिले जात असल्याने अनावश्यक तण उगवत नाही. परिणामी, निंदणी आणि खुरपणीचा खर्च वाचतो.

विद्राव्य खते थेट पाण्याच्या प्रवाहाद्वारे झाडांच्या मुळापर्यंत पोहोचवली जातात. यामुळे खतांचा पुरेपूर वापर होतो आणि वाया जाणारी खत बचत होते.कमी पाण्यात काम होत असल्याने सिंचनाचा वेळ वाचतो. यामुळे शेतातील विद्युत पंप (मोटर) कमी वेळ चालवावे लागतात, ज्यामुळे विजेची व बिलाची बचत होते.पाण्याचा प्रवाह अत्यंत संथ व



नियंत्रित गतीने असल्याने शेतातील सुपीक माती वाहून जात नाही व जमिनीची सुपीकता टिकून राहते.

शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या संयुक्त समन्वयातून पुढील प्रमाणे अनुदानाचे वाटप केले जाणार आहे:

१. अनुसूचित जाती (एस सी )व अनुसूचित जमाती (एस टी ) प्रवर्ग:केंद्र शासनाचे अनुदान ( ५५% राज्य शासनाचे अतिरिक्त अनुदान: ३५% (बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेतून) एकूण एकत्रित मिळणारे अनुदान: ९०% (या प्रवर्गातील शेतकऱ्यांना केवळ १०% रक्कम स्वतः खर्च करावी लागेल. अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी (इतर प्रवर्ग):केंद्र शासनाचे अनुदान ५५%

२५% (मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून) एकूण एकत्रित मिळणारे अनुदान: ८०%

इतर सर्व लाभार्थी (सर्वसाधारण/मोठे शेतकरी):केंद्र शासनाचे अनुदान: ४५%

राज्य शासनाचे अतिरिक्त अनुदान: ३०% (मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून) * एकूण एकत्रित मिळणारे अनुदान: ७५% ---

**नोंदणी व संपर्काचे आवाहन**

पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवून शेतीची उत्पादकता वाढवणे हेच या योजनेचे मुख्य ध्येय आहे. तरी तळोदा तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या योजनेचा तात्काळ लाभ घेऊन आपल्या शेतात आधुनिक सिंचन प्रणाली कार्यान्वित करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी, तळोदा यांनी केले आहे.योजनेच्या अधिक माहितीसाठी, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांच्या माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या गावातील कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक किंवा थेट तालुका कृषी कार्यालय, तळोदा यांच्याशी त्वरित संपर्क साधावा.

# कुंडम परिसरात नक्षली बॅनर व पत्रके आढळल्याने खळबळ; विविध कंपन्यांविरोधात आंदोलनाचे आवाहन

**दैनिक वादळ वार्ता**

**एटापल्ली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील पिपली बुर्गी उपपोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंडुम गावाजवळ नक्षलवाद्यांचे बॅनर व पत्रके आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस व सुरक्षा यंत्रणा तात्काळ सतर्क झाली असून संपूर्ण परिसरात व्यापक शोधमोहीम आणि तपास सुरू करण्यात आला आहे.

घटनास्थळी मिळालेल्या पत्रकांमध्ये स्वतःला माओवादी कम्युनिस्ट पक्षाचे असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पत्रकांद्वारे विविध खाण व औद्योगिक कंपन्यांविरोधात स्थानिक नागरिकांनी एकत्र येऊन आंदोलन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः ओम साईराम , नॅचरल रिसॉर्सेस कंपनी, सनफ्लॅग, गडथ, युनिव्हर्सल प्रकल्प तसेच इतर विकास प्रकल्पांविरोधात तीव्र भूमिका घेत संबंधित कामे तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पत्रकांमध्ये ग्रामीण नागरिक, सरपंच आणि गावपाटील यांनी कंपन्यांच्या कामकाजाला विरोध करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच कंपन्यांमुळे जल, जंगल आणि जमीन धोक्यात येत असून स्थानिक आदिवासी समाजाच्या अस्तित्वावर भविष्यात गंभीर परिणाम होऊ शकतात, असा दावा करण्यात आला आहे. कंपन्यांना सहकार्य करणाऱ्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही या पत्रकांतून देण्यात आल्याचे समोर आले आहे.याशिवाय ओम साईराम, सनफ्लॅग प्रकल्प, हेटळकसा-कुदरी-मोहुर्ली परिसरातील नॅचरल कंपनी, जेएसडब्ल्यू प्रकल्प, युनिव्हर्सल तसेच खेमरागडी-पिपली बुर्गी परिसरात प्रस्तावित ड्रोन सर्वेक्षणालाही विरोध दर्शविण्यात आला असून संबंधित सर्व कामे तात्काळ बंद करण्याची चेतावणी देण्यात आली आहे.

दरम्यान, गेल्या काही वर्षांत सुरक्षा दलांनी सातत्याने राबविलेल्या नक्षलविरोधी कारवायांमुळे गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी कारवाया मोठ्या प्रमाणात कमकुवत झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. मात्र कुंडम गावाजवळ आढळून आलेले हे बॅनर आणि पत्रके नक्षलवादी हालचाली पुन्हा सक्रिय होत असल्याची शक्यता व्यक्त करत असल्याने सुरक्षा यंत्रणांची चिंता वाढली आहे.पोलीसांनी घटनास्थळावरून बॅनर व पत्रके जप्त करून त्यांचा तपास सुरू केला आहे. परिसरातील जंगल भागात शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त औसा मतदारसंघात ‘जनसेवा दिन’; तयारीचा आढावा

**दैनिक वादळ वार्ता**

**लातूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त औसा मतदारसंघात ‘जनसेवा दिन’ विविध लोकाभिमुख उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर औसा तहसील कार्यालयात आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत विविध शासकीय विभागांच्या प्रमुखांची आढावा बैठक १० जुलैला पार पडली.बैठकीत शेती, पशुसंवर्धन, जलसंधारण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, सामाजिक वनीकरण, महावितरण, परिवहन, महिला व बालविकास तसेच महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध जनकल्याणकारी योजनांचा आढावा घेण्यात आला. शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून त्यांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना आमदार अभिमन्यू पवार यांनी दिल्या.

जनसेवा दिनानिमित्त मतदारसंघात वृक्षारोपण, फळबाग लागवड, पशू आरोग्य शिबिरे, लंपी आजार प्रतिबंधक लसीकरण, रस्त्यांचे लोकार्पण, महिला बचत गटांसाठी अस्मिता भवनांच्या कामांचा शुभारंभ, ग्रामपंचायत व अंगणवाडी इमारतींची कामे, सौरऊर्जा उपक्रम, आरोग्य तपासणी शिबिरे, जलसंधारणाची कामे, पाणीपुरवठा योजनांचे लोकार्पण, शिधापत्रिका वाटप, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे तसेच नागरिकांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.यावेळी आमदार पवार यांनी प्रत्येक विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने काम करून जनसेवा दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता नागरिकांना प्रत्यक्ष लाभ देणारा उपक्रम ठरावा, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :-त्रिंबक प्रभाकर धुमक रा.घाटेवाडी
यांना श्री. गिन्यानदेव निवृत्ती नेहकर रा. केज यांचे कडून खालील चतु : सिमेच्या आतील स.न.२२९/४ खुला प्लॉट नं.४८
वार्ड क्रं.--- विभाग. ---
पुर्व : नेहरकर गिन्यानदेव
पश्चिम : नेहरकर गिन्यानदेव
दक्षिण : नेहरकर गिन्यानदेव
उत्तर : ३० फुटाचा रस्ता
लांबी : पू. प.१२.१९ मिटर फूट रुंदी : द. उ.१२.१९ मिटर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं .२३८६ दि. / /२० आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १३/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- कल्पना गंगाराम नखाते रा. केज
यांना श्री. वचिष्ट बंकट कदम
यांचे कडून खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ७७०१ खुला प्लॉट नं.--- स.न.१०३/अ
वार्ड क्रं.--- विभाग. ---
पुर्व : १० फुटाचा रस्ता
पश्चिम : पांडुरंग सत्वधर
दक्षिण : अश्रुबा मोतीराम काकडे
उत्तर : बारीक संतोबा काकडे
लांबी-द.उ.२८.७५ फूट रुंदी : पू. प.२२ फूट
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं .२५७३ दि.७/७/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- वनमाला अतुल सत्वधर रा. केज
यांना श्री. अतुल दत्तात्रय सत्वधर रा. केज यांचे कडून खालील चतु : सिमेच्या आतील स.न.१०३/अ खुला प्लॉट नं.---
वार्ड क्रं.--- विभाग. ---
पुर्व : अतुल सत्वधर
पश्चिम : महेश साधु सत्वधर
दक्षिण : अतुल सत्वधर
उत्तर : रस्ता
क्षेत्र ०-०१.०७ आर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.२३०७ दि.१८/६/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- १) साईराम मच्छिंद्र लांब रा.बनकरंजा २)स्वाती चंद्रकांत वळसे रा. केज
यांना श्री. १) राहुल बळीराम जाडकर २) सुनिता बळीराम जाडकर ३) अश्विनी शैलेश सूर्यवंशी
यांचे कडून खालील चतु : सिमेच्या आतील स.न.१०१/आ खुला प्लॉट नं.---
वार्ड क्रं.१ विभाग. क्रांतीनगर
चतु:सिमा
पुर्व : ज्योती चंद्रकांत वळसे
पश्चिम : मंडाबाई बन्सी पांचाळ
दक्षिण : रस्ता
उत्तर : रुपावती भिकाजी रोडे
क्षेत्र ०=०१.१० आर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.२३३० दि.१८/६/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून (७) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे. नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- बेबी रावसाहेब कुलकर्णी रा. चिंचोलीमाळी यांना श्री. १) विनोद ज्ञानोबा शिंदे २) पृथ्वीराज विनोद शिंदे
३) मनिषा विनोद शिंदे १ ते ३ तर्फे खास मुखत्यार एच.के. डेव्हलपर्स न्ड कंट्रक्शन कंपनी
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ८९०१ खुला प्लॉट नं.८ स.न.२२८/२/२
वार्ड क्रं.१३ विभाग. अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : ९ मिटर रुंदीचा रस्ता
पश्चिम : प्रविण ज्ञानोबा शिंदे
दक्षिण : प्लॉट क्र.९
उत्तर : प्लॉट क्र.७
लांबी : पू.प.९.५५ मिटर रुंदी : द.उ. ८.२५ मिटर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.३८० दि.६/२/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- महेश दत्तात्रय शेटे
रा. केज यांना श्री. १) विनोद ज्ञानोबा शिंदे २) पृथ्वीराज विनोद शिंदे
३) मनिषा विनोद शिंदे १ ते ३ तर्फे खास मुखत्यार एच.के. डेव्हलपर्स न्ड कंट्रक्शन कंपनी
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ८९३० खुला प्लॉट नं.३९ स.न.२२८/२/२
वार्ड क्रं.१३ विभाग. अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : प्रमोद ज्ञानोबा शिंदे
पश्चिम : ९ मिटर रुंदीचा रस्ता
दक्षिण : प्लॉट क्र.३८
उत्तर : प्लॉट क्र.४०
लांबी : पू.प.९ मिटर रुंदी : द.उ. ८.२५ मिटर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.१९६८ दि.१/६/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- राणी हौसेराव आरडे
रा. घाटेवाडी यांना श्री. १) विनोद ज्ञानोबा शिंदे २) पृथ्वीराज विनोद शिंदे
३) मनिषा विनोद शिंदे १ ते ३ तर्फे खास मुखत्यार एच.के. डेव्हलपर्स न्ड कंट्रक्शन कंपनी
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ८९१२ खुला प्लॉट नं.१९ स.न.२२८/२/२
वार्ड क्रं.१३ विभाग. अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : प्लॉट क्र.२६
पश्चिम : ९ मिटर रुंदीचा रस्ता
दक्षिण : प्लॉट क्र.१८
उत्तर : प्लॉट क्र.२०
लांबी : पू.प.१०.५० मिटर रुंदी : द.उ. ९.२५ मिटर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.३५६३ दि.१६/१०/२०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- संतोष अशोक सूर्यवंशी
रा.पिसेगाव यांना श्री. १) विनोद ज्ञानोबा शिंदे २) पृथ्वीराज विनोद शिंदे
३) मनिषा विनोद शिंदे १ ते ३ तर्फे खास मुखत्यार एच.के. डेव्हलपर्स न्ड कंट्रक्शन कंपनी
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ८८९८ खुला प्लॉट नं.५ स.न.२२८/२/२
वार्ड क्रं.१३ विभाग. अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : ९ मिटर रुंदीचा रस्ता
पश्चिम : प्रविण ज्ञानोबा शिंदे
दक्षिण : प्लॉट क्र.६
उत्तर : प्लॉट क्र.४
लांबी : पू.प. ९.४७ मि. रुंदी : द.उ. ८.२५ मिटर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.५०९ दि.१७/२/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- महादु छगन थोरात
बनकरंजा यांना श्री. १) विनोद ज्ञानोबा शिंदे २) पृथ्वीराज विनोद शिंदे
३) मनिषा विनोद शिंदे १ ते ३ तर्फे खास मुखत्यार एच.के. डेव्हलपर्स न्ड कंट्रक्शन कंपनी
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ८९३१ खुला प्लॉट नं.४० स.न.२२८/२/२
वार्ड क्रं.---विभाग.---
चतु:सिमा
पुर्व : प्रमोद ज्ञानोबा शिंदे
पश्चिम : ९ मिटर रुंदीचा रस्ता
दक्षिण : प्लॉट क्र.३९
उत्तर : प्लॉट क्र.४१
लांबी : पू.प. ९ मि. रुंदी : द.उ. ८.२५ मिटर
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.५०८ दि.१७/२/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक

नगर पंचायत कार्यालय
केज, ता.केज जि. बीड.
दि. १४/ ७ /२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- सुषमा विष्णु काळे
रा. तांदळवाडी यांना श्री. १) विनोद ज्ञानोबा शिंदे २) पृथ्वीराज विनोद शिंदे
३) मनिषा विनोद शिंदे १ ते ३ तर्फे खास मुखत्यार एच.के. डेव्हलपर्स न्ड कंट्रक्शन कंपनी
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील घर नंबर ८८९७ खुला प्लॉट नं.४ स.न.२२८/२/२
वार्ड क्रं १३ विभाग.अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : ९ मिटरचा रस्ता
पश्चिम : प्रविण ज्ञानोबा शिंदे
दक्षिण : प्लॉट क्र.५
उत्तर : ९ मिटरचा रस्ता
लांबी : द.उ. ११.७० मिटर रुंदी : पू.प. ९.४२ मि.
खरेदी केला असून खरेदी खताचा दस्तऐवज नं.३७१९ दि.३/११/२०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**-नगरपंचायत कार्यालय ,केज**

# 'SIR' प्रक्रियेतून जाणीवपूर्वक काही नावे वगळण्याचे भाजपाचे षडयंत्र निवडणूक आयोगाने दबावाखाली काम करु नये- सुरेशचंद्र राजहंस

## संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा भाजपा डाव हाणून पाडा, एकाही नागरिकाचे नाव वगळले जाऊ नये

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

निवडणूक आयोगाने मतदार यांद्याचे विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रिया (डखठ) सुरु केलेली आहे. परंतु भारतीय जनता पक्षाचा मात्र या प्रक्रियेच्या माध्यमातून नावे वगळ्याचा कुटील डाव दिसत आहे. बिहार, पश्चिम बंगालमध्ये अशाच पद्धतीने मतदार याद्यांमध्ये घोळ करून व्होट चोरी करण्यात आली. आता मुंबईतही भाजापाचे नेते मतदार यादीतून काही नावे वगळण्यासाठी निवडणूक आयोगावर दबाव आणत आहेत. अशा प्रवृत्तींचा कुटील डाव लक्षात घ्यावा व पारदर्शक पद्धतीने एसआयआर प्रक्रिया राबवावी, असे मुंबई काँग्रेस प्रवक्ते सुरेशचंद्र राजहंस यांनी म्हटले आहे.सुरेशचंद्र राजहंस पुढे म्हणाले की, भाजपाचे एक माजी खासदार जाणीवपूर्वक मतदार याद्यांतून काही लोकांची नावे वगळण्याची मागणी करत आहेत. एखाद्या प्रकल्पाच्या पुनर्विकासासाठी ज्या इमारती पाडण्यात आल्या आहेत अथवा एसआरएचे प्रकल्प सुरु आहेत, त्या लोकांचे मॅपिंग करण्यात आलेले आहे पण ती नावे वगळावित अशी मागणी हे भाजपाचे महाशय करत आहेत. परंतु निवडणूक आयोगाने अशा पद्धतीच्या कोणत्याही दबावाला न जुमानता कोणाचेही नाव वगळले जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. पुनर्विकासासाठी तात्पुरते स्थलांतर करावे लागलेल्या लोकांची नावे जर वगळली तर तोच चुकीचा पायंडा पडेल व मुंबईत अनेक भागातून अशीच नावे वगळली जातील हे धोकादायक आहे.

एसआयआर प्रक्रियेसंदर्भात मुंबई काँग्रेसने वारंवार निवडणूक आयोगाला पत्र पाठवून व प्रत्यक्ष भेट घेऊन सुचना व आवाहन केलेले आहे. निवडणूक आयोग ही स्वतंत्र व स्वायत्त संस्था आहे, त्यांनी सत्ताधारी भाजपाच्या बेकायदेशीर मागण्यांना थारा देऊ नये. संविधानाने १८ वर्षावरील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिलेला आह तो अधिकारच काढून घेण्याचा मनुवादी भाजपाचा डाव आहे, तो हाणून पाडला पाहिजे, त्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांनीही एसआयआर प्रक्रियेवर बारीक नजर ठेवली पाहिजे, असेही सुरेशचंद्र राजहंस यांनी म्हटले आहे.



# दौंडमध्ये राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार २०२६ चा दिमाखदार सोहळा

## अंबालाल साठे यांना पुरस्कार प्रदान!

दैनिक वादळ वार्ता

**दिपक गोसावी । नंदुरबार**

ज्ञान संकल्प सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित 'राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार २०२६' वितरण सोहळा दौंड येथे उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात तळोदा येथील महात्मा फुले सामाजिक लोकविकास बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, अनुसूचित जाती मोर्चा (भाजपा) चे माजी जिल्हाध्यक्ष, तसेच लहुजी शक्ती सेना उत्तर महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अंबालाल साठे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.नाशिक राज्य उत्पादन शुल्काचे पोलीस अधीक्षक संतोष तानाजी झगडे यांच्या हस्ते साठे यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व फीत कापून करण्यात आले.

या सोहळ्याला राजकीय व सामाजिक क्षेत्रातील विविध पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने: साहेबराव पोळ (जिल्हा परिषद सदस्य, गोपाळवाडी गट, पुणे),सारिका कुल (महिला उपाध्यक्ष),फिरोज पठाण (भारतीय जनता पार्टी, दौंड शहर अध्यक्ष),सदाशिव रणदिवे (संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक सचिव),यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# देगलूरला ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय द्या आरोग्यमंत्री आबिटकर यांच्याकडे जोरदार मागणी

## सीमावर्ती भागातील माता–भगिनींसाठी दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा पाठपुरावा; आरोग्यमंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

सीमावर्ती देगलूर शहर व परिसरातील माता–भगिनींना वेळेवर, सुरक्षित व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना. श्री. प्रकाशजी आबिटकर यांची सदिच्छा भेट घेऊन देगलूर येथे ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय तातडीने मंजूर करण्यात यावे तसेच या रुग्णालयासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. यावेळी देगलूरसारख्या सीमावर्ती भागात महिलांसाठी स्वतंत्र व अत्याधुनिक आरोग्य सुविधा उभारणे ही काळाची गरज असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. प्रसूती सेवा, स्त्रीरोग उपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय



सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध झाल्यास हजारो माता–भगिनींना मोठा दिलासा मिळेल, असेही यावेळी सांगण्यात आले.

यासंदर्भात शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असून, देगलूरच्या आरोग्य सुविधांमध्ये भरीव वाढ व्हावी आणि महिलांना अधिक सक्षम, आधुनिक व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळावी, यासाठी प्रत्येक स्तरावर अविरत प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.दरम्यान, राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. ना. श्री. प्रकाशजी आबिटकर यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत, प्रस्तावाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यामुळे देगलूर परिसरातील नागरिकांमध्ये आशावादाचे वातावरण निर्माण झाले असून, स्वतंत्र स्त्री रुग्णालयाचा मार्ग लवकरच मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गंगाखेड येथे सवंगडी कट्टा सामाजिक समूहातर्फे वारकरी आरोग्य सेवा शिबिराचा सांगता समारंभ उत्साहात

दैनिक वादळ वार्ता

**गंगाखेड । गोपाळकृष्ण पाळवदे**

सवंगडी कट्टा सामाजिक समूह, गंगाखेड यांच्या वतीने पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या वारकरी माऊलींसाठी आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय मोफत आरोग्य सेवा शिबिराचा सांगता समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.दि. ७ जुलैपासून सुरू झालेल्या या सेवा उपक्रमात वारकरी माऊलींना मोफत वैद्यकीय तपासणी, औषधोपचार, प्रथमोपचार तसेच विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. संत जनाबाईंच्या जन्मभूमी असलेल्या गंगाखेड नगरीत वारकऱ्यांना प्रेम, आपुलकी आणि सेवाभावाचा अनुभव देण्याचा प्रयत्न या शिबिरातून करण्यात आला.



यंदा या सेवायज्ञाचे सलग ११ वे वर्ष पूर्ण झाल्याने सांगता समारंभ विशेष उत्साहात पार पडला. या प्रसंगी सेवाकार्यात योगदान देणाऱ्या डॉक्टर, स्वयंसेवक,देणगी दाते,सेवाभावी नागरिक तसेच सवंगडी कट्टा सामाजिक समूहातील सर्व सदस्यांचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि वारकरी परंपरेचे जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ वैद्यकीय चिकित्सक डॉ. शांतीलालजी काबरा होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. हेमंतजी मुंढे,संत जनाबाई संस्थानचे सचिव डॉ.दिनकरजी मुंढे, ज्येष्ठ वैद्यकीय चिकित्सक डॉ. संजयजी भरड, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ तथा जिल्हा परिषद सदस्या डॉ. शोभाताई कदम, सामाजिक कार्यकर्त्या मंजुताई दर्डा, प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अर्चना निरस,वैद्यकीय अधिकारी कैलास चांदकर तसेच समाजसेवक प्रभाकर आप्पा दावलबाजे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांनी सवंगडी कट्टा सामाजिक समूहाच्या सातत्यपूर्ण सेवाकार्याचे कौतुक करत समाजहितासाठी अशा उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सवंगडी कट्टा सामाजिक समूहातील सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# विनयभंग व मारहाणीच्या गुन्ह्यात ५ आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर


## ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.अशोक मुंडे व सहकाऱ्यांचा न्यायालयात यशस्वी युक्तिवाद; आरोपींना मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

तलवाडा पोलीस ठाण्यात विनयभंग, बेकायदेशीरपणे घरात घुसून मारहाण करणे, गळ्यातील दागिने आणि रोख रक्कम बळजबरीने काढून घेतल्याचा गंभीर गुन्हा दाखल असलेल्या ५ आरोपींना न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकरणातील आरोपींनी दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाकडून मंजूर करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत काही दिवसांपूर्वी फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींनी घरात बेकायदेशीरपणे प्रवेश करून मारहाण केली, तसेच घरात घुसून गळ्यातील दागिने बळजबरीने हिसकावून घेतले आणि पैसे काढून घेतले. यासोबतच विनयभंग व







दमदाटी केल्याप्रकरणी विविध गंभीर कलमांखाली हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्याने अटकेची शक्यता गृहीत धरून आरोपींनी वकिलामार्फत अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती.

**बचाव पक्षाचा न्यायालयात जोरदार युक्तिवाद**

सदर जामीन अर्जावरील सुनावणी दरम्यान आरोपींच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.अशोक मुंडे यांनी बाजू मांडली. या खटल्यात ॲड.मुंडे यांना ॲड.तुषार विधाते आणि ॲड.आदर्श जाधव यांनी कायदेशीर सहकार्य केले. न्यायालयाचा निर्णयदोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि प्रकरणाची पार्श्वभूमी विचारात घेऊन न्यायालयाने बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरला. न्यायालयाने आरोपी यांना अटी व शर्तीसह पाचही आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आरोपींना मोठा दिलासा मिळाला आहे.

# दरवर्षी नाट्यगृहांच्या भाड्यात केवळ १ ते २ टक्के वाढ-मंत्री आशिष शेलार

## कोविडपूर्वीचाच मूळ दर आधारभूत मानणार नाट्यसृष्टीच्या गोडाऊन व वाहनतळाच्या प्रश्नासाठी महिनाभरात पर्याय

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

मुंबई महानगर प्रदेशातील महानगरपालिका क्षेत्रातील नाट्यगृहांच्या भाड्यामध्ये दरवर्षी करण्यात येणारी ५ टक्क्याची भाडेवाढ आता केवळ केवळ १ ते २ टक्के भाडेवाढ करण्याबाबत फेरविचार करण्यात येणार असून, भाडेवाढीचा आधार हा कोविडपूर्वीचा मूळ दरच मानण्यात येईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. तसेच मराठी नाटचसृष्टीच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गोडाऊन व वाहनतळाच्या प्रश्नावर महिनाभरात व्यवहार्य पर्याय सादर करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.मंत्रालयात झालेल्या या बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, अभिनेते प्रशांत दामले, निर्माते प्रसाद मच्छिंद्र कांबळी तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मराठी नाट्य व्यावसायिक निर्माता संघाचे प्रतिनिधी, विविध महानगरपालिकांचे अधिकारी आणि संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिकांच्या अधिकाऱ्यांनी नाट्यगृहांच्या वीज, देखभाल व दुरुस्तीवरील वाढत्या खर्चामुळे भाडेवाढ आवश्यक असल्याची भूमिका मांडली. यावर मंत्री शेलार यांनी मराठी नाट्यसृष्टीचे हित आणि महानगरपालिकांची आर्थिक शाश्वतता यांचा समतोल राखण्याचे निर्देश दिले. त्यानुसार भाडेवाढीचा आधार कोविडपूर्वीचा मूळ दर



ठेवण्यात येणार असून, दरवर्षांनी ५ टक्के भाडेवाढ करण्याऐवजी दरवर्षी केवळ १ ते २ टक्के भाडेवाढ करण्याच्या प्रस्तावावर संबंधित महानगरपालिका व स्थायी समित्यांनी फेरविचार करावा, असे निर्देश देण्यात आले.बैठकीत नाट्य व्यावसायिकांनी दादर, परळ, लालबाग, शिवडी परिसरात नाट्यसाहित्य, नेपथ्य आणि बस पार्किंगसाठी कायमस्वरूपी जागेची मागणी केली. सध्या उपलब्ध जागा अपुरी असून अनेक वर्षांपासून गोडाऊन व वाहनतळाचा प्रश्न प्रलंबित असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. पावसाळ्यात नेपथ्याचे नुकसान होत असल्याने तसेच व्यावसायिक दराने गोडाऊन घेणे शक्य नसल्याने शासन किंवा महानगरपालिकेकडून जागा उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

यावर मंत्री शेलार यांनी संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांना मानखुर्द येथील अतिक्रमणमुक्त जागेवरील फिल्म सिटीला देण्यात येणाऱ्या जागांपैकी काही जागा नाट्यसृष्टीसाठी गोडाऊन आणि वाहनतळाची सुविधा उपलब्ध करून देता येईल का, याबाबत महिनाभरात व्यवहार्य पर्याय सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांनीही पर्यायी जागेचा प्रस्ताव तयार करण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट केलेयाशिवाय नाट्यगृहांचे उत्पन्न वाढविण्यासाठी सौरऊर्जा प्रकल्प, एलईडी जाहिरात फलक आणि इतर उत्पन्नवाढीच्या उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी महानगरपालिकांनी पुढील तीन महिन्यांत विशेष समिती स्थापन करावी, असेही निर्देश मंत्री ड. आशिष शेलार यांनी दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077